कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
# राष्ट्रीय महामार्ग विभाग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पीडब्ल्यूडी ग्रीन बिल्डिंग, उंटवाडी रोड, नाशिक - ४२२ ००२
फोन नं. ०२५३-२५७३२७० ईमेल-eenhnashik@gmail.com
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. रामविना/प्रशा-१/१५५०/२०२३ दिनांक : २६/०४/२०२३

प्रति,
उप वनसंरक्षक,
पूर्व विभाग नाशिक

**विषय** : साक्री-सटाणा-चांदवड-कोपरगाव-शिर्डी राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२जी चे (सेक्शन सटाणा ते मंगरुळ) कि.मी. ६४/१०० ते १०१/१४० मध्ये रुंदीकरण दुपदरीकरण /चौपदरीकरण उन्नतीकरण करणे जि. नाशिक

**विषयांकित प्रकल्पासाठी Forest (Conservation) Act १९८० अंतर्गत भाबडबारी घाटातील वन क्षेत्राचे वळतीकरण करणेबाबत.**

**संदर्भ** : १. Ministry of Environment, Forest and Climate Change (Foret Conservation Division) File No.FC-११/५०/२०२०-FC dated २६/१०/२०२१.
२. विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. प्रशा/नाशिक/वि.म.राक्र-१/३४०६/२०२२ दि. २३/०५/२०२१ व रामवि/ना/रेशा/४६६३/२०२२ दिनांक ०६/०९/२०२२.
३. उप वनसंरक्षक, पुर्व भाग, नाशिक यांचे पत्र जा.क्र.कक्ष-३/जमीन/सटाणा-मंगरुळ रस्ता ७.९१७/६९४/२०२२-२३ दि. ९/११/२०२२.
४.विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. रा.म.वि/नाशिक/प्रशा/२५७/२०२३ दि. १९/०१/२०२३.
५. उपवनसंरक्षक, पुर्व भाग, नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र.कक्ष-३/जमीन/सटाणा-मंगरुळ रस्ता ७.९१७/२४२३/२०२२-२३ दि. २७/०१/२०२३.
६. उप-अधीक्षक, भूमि अभिलेख ,चांदवड यांचे पत्र जा.क्र. भूमापन/शिदा/कावि ५६,५७/ भूसंपादन/राष्ट्रीय महामार्ग/क्र.७५२/२०२३ चांदवड जा.क्र. ५७० दि. २५/०२/२०२३.
७. उप-अधीक्षक,भूमि अभिलेख,देवळा यांचे पत्र जा.क्र.भूसंपादन/राष्ट्रीय महामार्ग/क्र. ७५२/२०२३ देवळा जा.क्र. ३१५/२०२३ दि. २७/०२/२०२३.
८. विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. रामविना/प्रशा-१/१०५२/२०२३ दि. १६/०३/२०२३.
९. आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.१३७८ दिनांक-२५/०३/२०२३.
१०. मुख्य वनसंरक्षक,नाशिक यांचे पत्र क्र.२९८६ दिनांक ३१/०३/२०२३
९. मे.एल.एन.मालवीया, इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा.लि.यांचे पत्र क्र. ५१८ /२०२३ दि.१९/०४/२०२३.
१०.उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग,क्र.१,नाशिक यांचे पत्र जा.क्र.रा.म.उपवि/नाशिक/प्रशा/ १८६ / २०२३ दि. २५ /०४ /२०२३

उपरोक्त विषयांकित सटाणा-देवळा-मंगरुळ-चांदवड रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ जी चा भाबडबारी घाटातील वनक्षेत्राचे वळतीकरणाचा प्रस्ताव या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र.२ अन्वये यापुर्वीच सादर करण्यात आला आहे. या अनुषंगाने प्रस्तावासंदर्भात आपले समवेत यापूर्वीच दिनांक 19.10.2022 रोजी संयुक्त पाहणी करण्यात आली आहे. तद्नंतर संदर्भ पत्र क्र.४ च्या पत्रान्वये संयुक्त पाहणी दरम्यान उपस्थित मुद्दयांचा शेरेपूर्तता अहवाल D.P.R. Consultant

Clerk to the
Dy. Conservator of Forests
East - Nasik

यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर आपले कार्यालयाकडे सविस्तर अहवाल सादर करण्यात आला होता व प्रस्तुत पत्रामध्ये विषयांकित रस्ता हा स्वातंत्र पूर्व काळापासुन अस्तित्वात असल्याचे विविध पुरावे दाखले देण्यात आले आहे. त्यामुळे रस्ता वळतीकरण्याचे वन क्षेत्र हे कमी करून फेर अहवाल सादर करण्यात आला होता (संदर्भ क्रं.०४). त्यानुषंगाने आपले कार्यलयाचे संदर्भ पत्र क्र.५ अन्वये वनहद्दीतील महामार्गाच्या क्षेत्राचा दर्जा "वन" असल्याची बाब नमुद करण्यात आली आहे. त्यास वन (संवर्धन) १९८० च्या तरतुदी लागू असल्याने म्हटले आहे. व या कार्यालयाकडे diversion Area Statement बाबत मागणी करण्यात आली होती.

सदरचे अनुषंगाने, उपअधीक्षक, देवळा व चांदवड, भूमी अभिलेख (Land Record) कार्यालयाकडे रस्त्याची मालकी बाबत शहानिशा केली असता त्यांचे संदर्भ पत्र क्र. ६ व ७ चे प्राप्त अहवालानुसार, सदर रस्ता हा स्वातंत्र पुर्व काळापासुन अस्तीत्वात असुन रस्त्याच्या दोन्ही बाजुस वनक्षेत्र आहे तसेच रस्त्याची रुंदी ही पुर्वी पासुनच २२ ते २४ मीटर आहे असे शासकीय दस्तावेजासह या विभागास स्पष्ट केले आहे व त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव विविध पुराव्यानिशी या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्रं.८अन्वये आपणास सादर केला आहे.

वरील अनुषंगाने पुनश्च सादर करण्यात येते कि, महसूल विभागाचे व सा.बां.विभागाचे शासकिय दस्तावेज लक्षात घेता सदर वन हद्दीतील रस्ता हा १९८० पुर्वीपासुनच सा.बां.विभागाचे मालकीचे राज्यमार्ग क्र.१७ हा २२.०० ते २४.०० मीटर रुंदीचा रस्ता अस्तीत्वात आहे व त्याचा वापर १९८० पुर्वी **"बिगर वने"** म्हणुन वापर होता. तसेच प्रस्तुत संदर्भ पत्र क्र.६ व ७ नुसार उप-अधीक्षक,भूमि अभिलेख कार्यालय मार्फत प्राप्त अहवालानुसार प्रस्तुत रस्त्याची सा.बा.विभागाची हद्द स्पष्टपणे दिसत आहे त्या नुसार १९८० पूर्वी सदर रस्त्यावर खडीचा थर, डांबरीकरण, दोन्ही बाजुस मुरुम बाजुपट्टया, कच्च्या गटारी व संरक्षण भिंत इ. अस्तीत्वात आहे. यासर्व बाबी लक्षात घेता रस्त्याचा वापर १९८० चा कायदा अस्तीत्वात येण्यापुर्वी बिगरवने म्हणुन होत असल्याचे महसूल विभागाच्या भूमी अभिलेख कार्यालयाने मान्य केल्याने **सदर रस्त्याला वन (संवर्धन) १९८० च्या तरतुदी लागु होत नाही** व तसेच उपरोक्त प्रस्तावाबाबत मा. प्रधान सचिव (वने) मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि.०६/०३/२०२३ रोजीच्या बैठकीत (VC) देखील देण्यात आलेल्या सुचनेनुसार प्रकल्प यंत्रणेने Forest Conservation Act 1980 अंमलात येण्या अगोदर रस्ता अस्तित्वात असल्याचे पुरावे दिल्यास वन (संवर्धन) १९८० च्या तरतुदी लागु होणार नाही अश्या स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत.

सदरचा रस्ता वळतीकरण्याचा प्रस्ताव पुढे आपणांमार्फत मुख्य वनसंरक्षक,नाशिक.यांचेकडे दिनांक २५/०३/२०२३ रोजी सादर करण्यात आला होता. तद्नंतर मुख्य वनसंरक्षक,नाशिक यांचे पत्र क्र.2986 दिनांक ३१.०३.२०२३ व Ministry of Environment, Forest & Climate Change, New Delhi यांचे पत्र क्र.FC-११/११७/२०१९-FC I/३९६९३/२०२३ दिनांक १५.०३.२०२३ च्या पत्राच्या अनुषंगाने DPR Consultant मे.एल.एन.मालवीया, इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा.लि.भोपाल (M.P) यांचेकडून प्रस्तुत वळतीकरणाच्या क्षेत्राचे सर्वे.न.व कंपार्टमेंट न. सह सुधारित नकाशे प्राप्त झालेले आहेत व त्यानुषंगाने खालीलप्रमाणे फेर सादर करण्यात येत आहे.

सटाणा मंगरूळ रा.म.क्र.752जी रस्त्यास लागणाऱ्या वनक्षेत्राचा तपशील

| अ. क्र | घटकानुसार विभाजन | गाव | कंपार्टमेंट नंबर | सर्व्हे नं/गट नं. | Patch | वन हद्दी साखळी क्र. | | रुंदी (मी.) | लांबी (मी.) | ताब्यात असलेला अस्तित्वातील रस्त्याचे क्षेत्र (१९८० पूर्वीच्या वनवापरांतर्गत - सरकारी महसूल विभागाच्या नोंदीनुसार) (अ) | रस्त्याच्या वळण व Realignmentसुधारणाकरिता रस्त्यालगत वाढीव अतिरिक्त वनक्षेत्र (ब) | एकूण क्षेत्र (हेक्टर) (अ+ब) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पासुन | पर्यंत | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| **तालुका देवळा** | | | | | | | | | | | | | |
| १ | प्रस्तावित realignment | भावडे | ३२४ | ११० | ०१ realignment | ९०/८१८ | ९१/११२ | ३० | २९४ | ०.००० | ०.८८२ | ०.८८२ | |
| २ | अस्तित्वातील रस्त्याचे सुधारणा | भावडे | ३२४ | ११० | अस्तित्वातील रस्ता | ९१/११२ | ९१/२१२ | १८ | ३१६ | ०.५६८८ | ०.००० | ०.५६८८ | |
| ३ | अस्तित्वातील रस्त्याचे वळण सुधारणा | भावडे | ३२४ | ११० | वळण सुधारणा | ९१/२१२ | ९१/४२८ | ६ | | ०.००० | ०.१८९६ | ०.१८९६ | राखीव वनक्षेत्र |
| ४ | अस्तित्वातील रस्त्याचे सुधारणा | भावडे | ३२४ | ११० | अस्तित्वातील रस्ता | ९१/४२८ | ९२/७४० | २४ | १३१२ | ३.१४८८ | ०.००० | ३.१४८८ | |
| ५ | प्रस्तावित realignment | भावडे | ३२४ | ११० | ०२ realignment | ९२/७४० | ९२/८०९ | ३० | ६९ | ०.००० | ०.२०७ | ०.२०७ | |

| तालुका चांदवड | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | प्रस्तावित realignment | खेलदरी | १६५ | ५५ | ०३ realignment | ९२/८०९ | ९२/८५० | ३० | ४१ | ०.००० | ०.१२३ | ०.१२३ | राखीव वन क्षेत्र |
| ७ | अस्तित्वातील रस्त्याचे सुधारणा | खेलदरी | १६५ | ५५ | अस्तित्वातील रस्ता | ९२/८५० | ९३/३८० | २४ | ५३० | १.२७२ | ०.००० | १.२७२ | |
| | | | | | | | | एकूण | २५६२ | ४.९८९६ | १.४०१६ | ६.३९१२ | |

हे आपले माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर करण्यात येत आहे.

**कार्यकारी अभियंता,**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग**
**नाशिक**

**सहपत्रः-** १) संदर्भीय पत्र क्र. ६ व ७.
२) जुने अभिलेखांच्या नकला, टिपण उतारा, गटाचा नकाशा.
३) वळतीकरणाचा सुधारित नकाशा.
४) KML file संपुर्ण प्रस्ताव ५ प्रतित.

**प्रत :-** अधीक्षक अभियंता, रा.म.मंडळ, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत :-** उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग,क्र.१,नाशिक यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना.

**प्रत :-** मे.एल.एन.मालवीया, इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा.लि.भोपाल (M.P) पिन कोड- ४६२०११ यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना.